5 FEB 2018

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाला प्रोत्साहन आवश्यक


## प्रा. देऑन शॉन : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. ४ : जागतिक स्तरावर रसायनशास्त्राच्या विविध शाखांमध्ये समन्वय निर्माण करून आधुनिक संशोधनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन दक्षिण कोरियातील हॅनयांग विद्यापीठातील वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ प्रा. देऑन शॉन यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस विषयावरील तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी, तर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात परिषदेचे आयोजन केले आहे.

डॉ. संजीव कट्टी म्हणाले, "हरित रसायनशास्त्र आणि हरित अभियांत्रिकी या शाखांमध्ये संशोधनाचा विकास होणे ही आजघडीची सर्वात मोठी गरज आहे. त्या दृष्टीने रसायनशास्त्रज्ञांमध्ये विचारमंथन होण्याची आवश्यकता आहे." कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "रसायनशास्त्र ही सर्वाधिक मोठी विज्ञानशाखा असून त्यामध्ये निरंतर संशोधन सुरू आहे. जागतिक स्तरावर एकूण प्रकाशित होणाऱ्या संशोधनामध्ये निम्म्याहून अधिक संशोधन हे एकट्या रसायनशास्त्रामधील आहे."

शिवाजी विद्यापीठाने तैवान येथील नॅशनल तैवान सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी या जगातील आघाडीच्या दोनशे विद्यापीठांत समाविष्ट असणाऱ्या विद्यापीठाशी शैक्षणिक सामंजस्य करार केला. या वेळी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात आले. परिषदेचे समन्वयक प्रा. अनिल घुले यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. जी. एस. गोकावी यांनी प्रास्ताविक केले, तर सचिव डॉ. सागर डेळेकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना दक्षिण कोरियातील प्रा. देऑन शॉन.**

5 FEB 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नियतकालिक स्पर्धेत सहभागी व्हा



कोल्हापूर : पारितोषिक वितरण प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ.डी.ए.देसाई, डॉ.श्रीकांत कोकरे, प्राचार्य डॉ.विवेक कुलकर्णी, डॉ.संजय खोत.

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कला, गुणांना प्रोत्साहन देणारी आहे. यात जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक २०१६-१७ स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. बिगर व्यावसायिक गटात विवेकानंद महाविद्यालयाच्या डॉ. डी. ए. देसाई संपादित 'विवेक', तर व्यावसायिक गटात घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समधील योगेश नामदेव धुळूगडे संपादित 'उमंग' नियतकालिकास प्रथम क्रमांक मिळाला. व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात कार्यक्रम झाला.

स्पर्धेसाठी ७४ बिगर व्यावसायिक महाविद्यालयांनी व १९ व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. स्पर्धेमध्ये १५६ विद्यार्थ्यांना व १५१ विद्यार्थिनींना अशी एकूण ३०७ विविध लेखांकरिता वैयक्तिक पारितोषिके मिळाली. विजेत्या महाविद्यालयांना फिरते चषक व प्रशस्तिपत्र विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांचे हस्ते देऊन गौरविण्यात आले.

बिगर व्यावसायिक गटामध्ये पेठवडगावच्या विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयातील डॉ. नाजिम इसाक शेख संपादित 'विजय' नियतकालिकेस द्वितीय, तर जतच्या राजे रामराव महाविद्यालयातील डॉ. श्रीकांत कोकरे संपादित 'रामविजय' नियतकालिकेस तृतीय पुरस्कार मिळाला. व्यावसायिक गटात आष्टाच्या अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमधील प्रा. ए. ए. जाधव संपादित 'ज्ञानदा' नियतकालिकेने द्वितीय व यड्रावच्या शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील एस. व्ही. कुंभार संपादित 'स्पंदन' नियतकालिकेने तृतीय क्रमांक पटकाविला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. श्रीकांत कोकरे, प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. संजय खोत यांनी मनोगत व्यक्त केले. प्राणीशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी संजोग माने हिने सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

5 FEB 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नियतकालिक स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा ही विद्यार्थी केंद्रित उपक्रम असून विद्यार्थ्यांच्या कला, गुणांना प्रोत्साहन देणारी स्पर्धा आहे. यामध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये आयोजित शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक २०१६-१७ स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या स्पर्धेसाठी ७४ बिगर व्यावसायिक महाविद्यालयांनी व १९ व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये १५६ विद्यार्थ्यांना व १५१ विद्यार्थिनींना अशी मिळून एकूण ३०७ विविध लेखांच्याकरिता वैयक्तिक पारितोषिके प्राप्त झाली आहेत.

या स्पर्धेचा निकाल : सर्वसाधारण विजेता पुरस्कार - बिगर व्यावसायिक गटामध्ये कोल्हापूरचे विवेकानंद कॉलेज(प्रथम क्रमांक) पेठवडगावचे श्री. विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय (द्वितीय क्रमांक), जतचे राजे रामराव महाविद्यालय (तृतीय क्रमांक).

सर्वसाधारण विजेता पुरस्कार - व्यावसायिक गटामध्ये अतिग्रे येथील सौ.सुशीला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टचे संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स (प्रथम क्रमांक), आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, (द्वितीय क्रमांक), यड्राव येथील शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग(तृतीय क्रमांक) यांना प्राप्त झाला.

यावेळी प्राचार्य डॉ.एस.वाय. होनगेकर, डॉ.डी.ए.देसाई, डॉ.श्रीकांत कोकरे, प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ.संजय खोत यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्राणीशास्त्र अधिविभागाची विद्यार्थिनी संजोग माने यांनी केले.

# अर्थसंकल्पीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक: डॉ. डांगे

**कोल्हापूर: प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठातून

केंद्रीय अर्थसंकल्प २०१८ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सर्व योजनांची यशस्विता ही प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. चालू अर्थसंकल्पातील सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात सरकारचे प्रयत्न व इच्छाशक्ती महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन अरुणाचल प्रदेशच्या अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. अजितकुमार डांगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित अर्थसंकल्पावरील कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

कुलगुरू डॉ. डांगे म्हणाले, जुलै २०१७ मध्ये सुरू करण्यात आलेल्या जीएसटीकरप्रणालीमुळे वित्तीय तुटीवर नकारात्मक परिणाम होत आहेत. तूट वाढत आहे. कारण सरकारने अद्याप जीएसटी कर संरचनेमध्ये साधेपणा व सुटसुटीतपणा निर्माण केलेला नाही. तसेच संघराज्य लोकशाही व्यवस्थेचा विचार करताना अर्थसंकल्पीय धोरण व योजना या काहीअंशी या राजकीय उद्देशासाठी निर्माण केलेल्या असतात. त्यामुळेच या प्रकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात काही अडचणी निर्माण होतात.

२०१९ च्या लोकसभा निवडणुका समोर ठेवून काही योजनांचे प्रतिबिंब २०१८च्या अर्थसंकल्पामध्ये दिसून येत असल्याचे डॉ. डांगे यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. शिर्के, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस.कांबळे, व्ही.पी.कट्टी, प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. व्ही.बी. ककडे, प्रा.डॉ. एम.एस.देशमुख, प्रा. डॉ. डी.सी. तळुले, डॉ. विशाखा आपटे, डॉ. कट्टीशशिकांत पंचगल्ले, आशिष भस्मे, दिग्विजय पाटील आदींनी विविध विषयांवर मते मांडली.

5 FEB 2018
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**नवीन कायद्याची अंमलबजावणी : मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात होणार सादर**

# शिवाजी विद्यापीठाचा आता सुटसुटीत अर्थसंकल्प

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीमुळे आता शिवाजी विद्यापीठाचा अर्थसंकल्प यावर्षीपासून सुटसुटीत होणार आहे शिवाय त्याची अचूकता वाढणार आहे. या अर्थसंकल्पाच्या प्रक्रियेत नव्या कायद्यानुसार विद्यापीठाच्या विविध घटकांशी निगडित असणाऱ्या नऊ मंडळांचा सहभाग झाला आहे.

विद्यापीठातील ४१ अधिविभाग आणि २६ सेवाकेंद्रे ही आपल्याकडील अपेक्षित जमा आणि खर्च हा वित्त व लेखा विभागाने नेमलेल्या उपसमितीच्या बैठकीमध्ये सादर करत होते तेथून ते वित्त व लेखा समिती, व्यवस्थापन परिषदेच्या माध्यमातून अधिसभेसमोर (सिनेट) मंजुरीसाठी जात होते. यातील उपसमितीच्या बैठकीत अंदाजित स्वरूपात विभागांना देण्यात येणाऱ्या निधीची निश्चिती व्हायची. त्यात अनेकदा काही विभागांना अपेक्षित निधी उपलब्ध व्हायचा नाही. मात्र, आता यावर्षीपासून हे थांबणार आहे. नवीन विद्यापीठ कायद्याची अंमलबजावणी सुरु केली आहे. या कायद्यानुसार विद्यापीठाच्या अर्थसंकल्पाची प्रक्रिया बदलली आहे. नव्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेली विविध नऊ मंडळे त्यांच्या अखत्यारित असलेल्या विभागांचे एकत्रितपणे अंदाजपत्रक तयार करुन ते वित्त व लेखा समितीसमोर मांडली. त्यांचे एकत्रिकरण करुन संबंधित समिती हा अर्थसंकल्प व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेसमोर मंजुरीसाठी सादर करणार आहे. त्यामुळे एकूणच अर्थसंकल्पाची प्रक्रिया पहिल्यापेक्षा सुटसुटीत होणार आहे.

## ३४४ कोटींचा अर्थसंकल्प

विद्यापीठाचे दरवर्षीचे अंदाजपत्रक हे साधारणत: ३०० ते ३४४ कोटी रुपयांचे असते. त्यातील खर्चाचा सर्वाधिक वाटा हा देखभाल-दुरुस्ती आणि वेतनावर होतो. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकात ३४१ कोटी ५१ लाख ३२ हजार रुपये अपेक्षित जमा, तर अपेक्षित खर्च ३४४ कोटी २७ लाख ८५ हजार इतका अंदाजित होते. हे अंदाजपत्रक २ कोटी ७७ लाख रुपये इतक्या तुटीचे होते. २०१६-१७ च्या तुलनेत अपेक्षित जमा रकमेत ११ कोटी ११ लाख आणि अपेक्षित खर्चात १४ कोटी २८ लाख रुपयांची वाढ झाली.

## वित्त समितीला अंदाजपत्रक सादर करणारी मंडळे

परीक्षा व मूल्यमापन मंडळ, बोर्ड ऑफ युनिर्व्हसिटी डिपार्टमेंट ॲण्ड इंटरडिसिपीलिनरी स्टडीज, नॅशनल ॲण्ड इंटरनॅशनल लिंकेजिस, लाईफ लाँग लर्निंग ॲण्ड एक्स्टेंशन, माहिती व तंत्रज्ञान मंडळ, इनोव्हेशन-इन्क्युबेशन ॲण्ड इंटरप्रायजेस, रिसर्च, नॉलेज रिसोर्स कमिटी, कॉलेज डेव्हपमेंट कमिटी



नवीन कायद्यानुसार यावर्षीचा विद्यापीठाचा अर्थसंकल्प तयार आणि सादर होणार आहे. या नव्या बदलामुळे अर्थसंकल्प अधिक सुटसुटीत होईल. अर्थसंकल्पाची सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. साधारणत: मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यापीठाची वित्त व लेखा समिती, व्यवस्थापन परिषद आणि अधिसभेसमोर अर्थसंकल्प मांडण्याच्यादृष्टीने प्रशासनाची तयारी सुरु आहे.

**- अजित चौगुले,**
प्रभारी वित्त व लेखाधिकारी

5 FEB 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थसंकल्पातील योजनांची अंमलबजावणी आवश्यक

## डॉ. ए. ए. डांगे : विद्यापीठात अर्थशास्त्र विभागातर्फे अर्थसंकल्पावर कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ४ : यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील सर्व योजनांची अंमलबाजवणी करण्यात सरकारचे प्रयत्न व इच्छाशक्ती महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन अरुणाचल प्रदेशमधील अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. ए. ए. डांगे यांनी केले. २०१९ च्या लोकसभा निवडणुका समोर ठेवून काही योजनांचे प्रतिबिंब २०१८ च्या अर्थसंकल्पामध्ये दिसून येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ : अन्वयार्थ व विश्लेषण' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



डॉ. डांगे म्हणाले, ''जुलै २०१७ मध्ये सुरू केलेल्या जीएसटी कर प्रणालीमुळे त्याचे वित्तीय तुटीवर नकारात्मक परिणाम होत असून ही तूट वाढत आहे. कारण सरकारने अद्याप जीएसटी कर संरचनेमध्ये साधेपणा व सुटसुटीतपणा आणलेला नाही.'' डॉ. शिर्के यांनी २०१८ च्या अर्थसंकल्पाचा सर्वांगीण आढावा घेतला. अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या योजनांच्या आर्थिक तरतुदी व प्रत्यक्ष खर्च यांचा तौलनिक अभ्यास करण्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. प्रा. डॉ. भारती पाटील यांनी २०१८ च्या अर्थसंकल्पाची राजकीय दृष्टिकोनातून मांडणी केल्याचे सांगितले. प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी सामाजिक विकास, प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी औद्योगिक विकास, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी शेती व ग्रामीण अर्थव्यवस्था, प्रा. डॉ. डी. सी. तळुले यांनी बाह्य क्षेत्रांचा विकास, डॉ. विशाखा आपटे यांनी ग्राहकांचे समाधान, डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी महिला सबलीकरण आणि शशिकांत पंचगल्ले यांनी कर संरचना व अर्थसंकल्प या विषयी सविस्तर विश्लेषण केले. दिग्विजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आशिष भस्मे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
5 FEB 2018 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अजितकुमार डांगे : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय कार्यशाळा

# अर्थसंकल्पीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्रीय अर्थसंकल्प २०१८ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सर्व योजनांची यशस्विता ही प्रभावी अंमलबजावणीवरती अवलंबून आहे. चालू अर्थसंकल्पातील सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात सरकारचे प्रयत्न व इच्छाशक्ती महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, अरुणाचल प्रदेशाचे कुलगुरू प्रा. डॉ. अजितकुमार ए. डांगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित 'केंद्रीय अर्थसंकल्प २०१८ -१९ अन्वयार्थ व विश्लेषण' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. डॉ. डी. सी. तळुले, प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, आदी यावेळी उपस्थित होते.

**महत्त्वाचे**

- जीएसटीमुळे त्याचे वितीय तुटीवर नकारात्मक परिणाम होत असून, ही तूट वाढत आहे.
- २०१९ च्या लोकसभा निवडणुका समोर ठेवून काही योजनांचे प्रतिबिंब अर्थसंकल्पामध्ये
- जीएसटी कर सरंचनेमध्ये साधेपणा व सुटसुटीतपणा नाही

प्रा. डॉ. डांगे म्हणाले की, जुलै २०१७ मध्ये सुरु करण्यात आलेल्या जीएसटी कर प्रणालीमुळे त्याचे वित्तीय तुटीवर नकारात्मक परिणाम होत असून, ही तूट वाढत आहे. कारण सरकारने अद्याप जीएसटी कर सरंचनेमध्ये साधेपणा व सुटसुटीतपणा निर्माण केलेला नाही. तसेच संघराज्य लोकशाही व्यवस्थेचा विचार करताना अर्थसंकल्पीय धोरण व योजना या काहीअंशी या राजकीय उद्देशासाठी निर्माण केलेल्या असतात. त्यामुळेच या प्रकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात काही अडचणी निर्माण होतात. २०१९ च्या लोकसभा निवडणुका समोर ठेऊन काही योजनांचे प्रतिबिंब २०१८च्या अर्थसंकल्पामध्ये दिसून येत असल्याचे प्रा. डॉ. डांगे यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. डॉ. डी. सी. तळुले, डॉ. विशाखा आपटे, डॉ. व्ही. पी. कट्टी अर्थसंकल्प याविषयी विश्लेषण व तौलनिक मांडणी केली.

प्रास्ताविक अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी, तर आशिष भस्मे यांनी आभार मानले. दिग्विजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक, शेतकरी, अर्थशास्त्राचे अभ्यासक, नागरिक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2018
सकाळ

# पर्यावरण शिक्षणातून प्रबोधन शक्य : डॉ. राऊत

कोल्हापूर, ता. ४ : पर्यावरण शिक्षणातून विविध प्रश्नांबद्दल शास्त्रीय दृष्टिकोनातून जागरूकता निर्माण करता येणे शक्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले.


पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी जाहीर केलेल्या आदेशानुसार येत्या गुढीपाडव्यापासून 'घनकचरा व्यवस्थापन कायदा २०१६' लागू होणार आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे विवेकानंद महाविद्यालयात आयोजित 'पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण' कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. राऊत यांनी 'पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व आणि व्याप्ती' विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी पर्यावरण रक्षणासाठी विद्यार्थ्यांची काय जबाबदारी आहे, याची माहिती दिली. डॉ. आसावरी जाधव यांनी 'घनकचरा - एक समस्या, त्याचे स्त्रोत, परिणाम' याविषयी माहिती दिली. त्या म्हणाल्या, "भारतात प्रतिमाणसी प्रतिदिवशी ०.५ किलो कचरा तयार होतो. भारताची लोकसंख्या पाहता घनकचरा प्रचंड प्रमाणात तयार होतो."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2018
पुढारी

# घनकचरा व्यवस्थापनाची गरज : डॉ. राऊत

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या असंतुलनास मानवाच्या बदलत्या गरजा, लोकसंख्यावाढ, प्रदूषण या बाबी जबाबदार आहेत. पर्यावरण शिक्षणातून या विविध प्रश्नांबद्दल शास्त्रीय दृष्टिकोनातून जागरूकता निर्माण करता येणे शक्य आहे. पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन काळाची गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. स्वामी विवेकानंद महाविद्यालय येथे 'पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण' एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर, डॉ. आसावरी जाधव यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 FEB 2018
पुढारी




कोल्हापूर : सायबर महाविद्यालयात आयोजित 'झिंग-२०१८' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. जयदीप बागी. सोबत प्रा. रेवती पाटील, डॉ. एम. एम. अली, विनायक साळोखे. (छाया : पप्पू आतार)

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीस स्पर्धांमधून चालना : डॉ. बागी

कोल्हापूर : आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कलागुणांना विचारपीठ उपलब्ध होते. यातूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले. सायबर महाविद्यालयात आयोजित 'झिंग-२०१८' आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. बागी म्हणाले, सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेण्याची गरज आहे. दिवसभरात बेस्ट ऑऊट ऑफ वेस्ट, कोडजिला, पथनाट्य, लोकनृत्य स्पर्धा झाल्या. प्रास्ताविक समन्वयक प्रा. रेवती पाटील यांनी केले. सोनिया राजपूत यांनी आभार मानले. यावेळी सायबरचे संचालक डॉ. एम. एम. अली, प्रशासकीय अधिकारी विनायक साळोखे, डॉ. दीपक भोसले आदी उपस्थित होते.

5 FEB 2018 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**जयसिंगपूर : द. कोरिया व तैवान विद्यापीठांच्या प्रतिनिधींसमवेत विजय मगदूम, ॲड. सोनाली मगदूम, आर. एस. कुलकर्णी व प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत.**

# द. कोरिया, तैवान विद्यापीठांबरोबर डॉ. मगदूम अभियांत्रिकीचा करार

**जयसिंगपूर / प्रतिनिधी :** दक्षिण कोरिया व तैवान विद्यापीठांच्या प्रतिनिधींसमवेत येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन करार नुकताच करण्यात आला असून, या करारामुळे आधुनिक तंत्रज्ञानातील नवनवीन बदलांचा उपयोग विद्यार्थ्यांना होणार असल्याचे प्रतिपादन संस्थेचे चेअरमन विजय मगदूम यांनी केले.

डॉ. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयास दक्षिण कोरियातील हॅनयॉग विद्यापीठातील सायन्स आणि टेक्नॉलॉजीचे डीन प्रा. देऑन शॉन, नॅशनल तैवान युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीचे प्रा. फॉगपॉग यांनी नुकतीच भेट दिली. या भेटीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनाबाबत करार व आधुनिक तंत्रज्ञानावर चर्चा करण्यात आली. प्रा. देऑन म्हणाले, अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना जगामध्ये खूप संधी आहेत. भारतात खूप पोटेन्शियल आहे. यासाठी विविध क्षेत्रातील लोकांनी एकत्र येऊन नवनिर्मितीसाठी प्रयत्न केला पाहिजे.


चेअरमन विजय मगदूम म्हणाले, तंत्रज्ञानाच्या विकासासाठी यातून तरुण संशोधक निर्माण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठासोबत परदेशातील विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्याचा आपला मानस आहे. ट्रस्टच्या उपाध्यक्षा ॲड. सोनाली मगदूम यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आर. एस. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत, डॉ. एस. बी. पाटील, प्रा. तौहिद मुजावर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
5 FEB 2018
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आरआयटी’चा आज पदवीपूर्ती समारंभ

कोल्हापूर, ता. ४ : येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा (आरआयटी) पाचवा पदवीपूर्ती समारंभ उद्या (ता. ५) होणार आहे. केपीआयटी टेक्नॉलॉजी, पुणेचे व्यवस्थापकीय संचालक किशोर पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिदे प्रमुख पाहुणे आहेत.

नियामक मंडळाचे अध्यक्ष भगतसिंह पाटील, आमदार आमदार जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोहळा होणार आहे. बी. टेक., एम. टेक. व एम.बी.ए. शाखेचा हा समारंभ आहे.


किशोर पाटील

श्री. किशोर पाटील यशस्वी उद्योजक आहेत. त्यांनी राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर यशाची शिखरे पादाक्रांत केलीत. ते विद्यार्थी व प्राध्यापकांनी तयार केलेले प्रकल्प व वस्तूंच्या प्रदर्शन पाहणार आहेत. सोबत उद्योजक, उद्योग प्रतिनिधी व प्राध्यापकांशी संवाद साधतील. कासेगांव शिक्षण संस्थेचे सचिव आर. डी. सावंत व एस. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन सुरु आहे. संचालक डॉ. सुषमा कुलकर्णी, परिक्षा विभाग नियंत्रक मुकुंद कवडे व रजिस्ट्रार राजन पडवळ यांनी ही माहिती दिली.